# धुळे कृषि महाविद्यालयात प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन

**दिनांक २०.०९.२०२४**

विस्तार शिक्षण संस्था, आनंद,गुजरात आणि कृषि महाविद्यालय धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने "स्ट्रॅटेजीज फॉर एक्सलन्स इन फॅकल्टी डेव्हलपमेंट फॉर एक्सटेन्शन" या विषयावर एक महत्त्वपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम दिनांक १८ सप्टेंबर ते २० सप्टेंबर या कालावधीदरम्यान कृषि विज्ञान केंद्र धुळे येथे पार पडला.

या प्रशिक्षण कार्यक्रमात धुळे कृषि महाविद्यालयातील आणि कृषि विज्ञान केंद्रातील एकूण ४० प्राध्यापक व अधिकारी यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमात सहभागींना संवाद कौशल्य, संवादातील अडथळे, वेळेचे व्यवस्थापन, तणाव व्यवस्थापन, नेतृत्व कौशल्य, विषयाचे प्रभावी सादरीकरण कसे करावे यासारख्या विविध विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणाचे आयोजन डॉ. बी. एम. इल्हे, मा. सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, धुळे यांच्या मार्गदर्शनखाली करण्यात आले. तर डॉ. ए. पी. निनामा, फॅकल्टी, विस्तार शिक्षण संस्था, आनंद हे या प्रशिक्षणाचे कोर्स डायरेक्टर होते.

डॉ. बी. एम. इल्हे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे महाविद्यालयातील प्राध्यापक व अधिकारी अधिक प्रभावीपणे शेतकरी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू शकतील, संवाद कौशल्यात सुधारणा होईल, वेळ व्यवस्थापन आणि तणाव व्यवस्थापन कौशल्ये व नेतृत्व कौशल्ये विकसित करण्यास मदत होईल असा विश्वास व्यक्त केला. सर्व सहभागी प्रशिक्षणार्थींना डॉ. बी. एम. इल्हे यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी डॉ. जे. एच. गायकवाड, प्राध्यापक कृषि विस्तार शिक्षण, डॉ. दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र धुळे, डॉ. श्रीकांत बन, तांत्रिक अधिकारी, कृषि महाविद्यालय, धुळे, श्री. भरत बाविस्कर तसेच कृषि महाविद्यालय व कृषि विज्ञान केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले.